## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | स्वप्नील काळुराम कानडे |
| माझे वय | : | ३१ वर्षे, |
| व्यवसाय | : | शेती, |
| राहणार | : | कळंब, ता. आंबेगाव, जि. पुणे. |

## सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती. एस. आर. पाचारणे यांचे मार्फत

**१.** दिनांक १४.०५.२०११ रोजी मी कळंब येथे होतो. पोलिसांनी मला त्या दिवशी पंचनाम्यासाठी कुठेही बोलविले नव्हते. माझेसमक्ष पोलिसांनी काहीही जप्ती केली नव्हती. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर पंच क्र. १ म्हणून माझी सही नाही.

**साक्षिदार सरकारी पक्षास सहाय्य करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन साक्षीदारास सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येत आहे.**

**२.** हे म्हणणे खरे नाही की दिनांक १४.०५.२०११ रोजी पोलिसांनी मला मंचर पोलिस स्टेशन येथे बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की त्या दिवशी फिर्यादी संदीप भगवान दळवी हे मंचर पोलिस स्टेशन येथे हजर होते. हे म्हणणे खरे नाही की माझेसमक्ष फिर्यादीने संजय बाळू बनकर व सिमा किशोर मोहितकर यांनी रेल्वे मध्ये खलाशी पदावर नोकरी लावून देतो असे म्हणून माझी फसवणुक केल्याचे पोलिसांना सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादीने माझेसमक्ष स्टॅम्प आणि चेक पोलिसांना काढून दिले होते. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादीने माझेसमक्ष पोलिसांना शंभर रूपये किमतीचे पाच स्टॅम्प काढून दिले होते. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादीने शशिकांत नारायण रामकर यांच्या नावाचे आय. सी.आय.सी. आय बॅकेचे तीन चेक पोलिसांना माझेसमक्ष काढून दिले होते. हे म्हणणे खरे नाही की सदरचे चेक आणि स्टॅम्प पोलिसांनी माझेसमक्ष जप्त करून ताब्यात घेतले. हे म्हणणे खरे नाही की पोलिसांनी माझेसमक्ष जप्ती पंचनामा तयार केला व मी जप्ती पंचनामा वाचून त्यावर सही केली. संजय बनकर याला मी ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपी संजय बनकर माझे चांगल्या परिचयाचा आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपी माझे चांगल्या परिचयाचा असल्यामुळे त्याला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. व्ही. एन. चासकर यांचे मार्फत.</u>**

नाकारला.

श्रवणोत्तर स्वीकृत

दिनांक : २२/०१/२०२० (एन. डी. मेश्राम)
घोडेगाव प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव